**जनलक्ष्मी को-ऑप. बँक लि., नाशिक** (शेडयुल्ड बँक)
केंद्र कार्यालय : "समृध्दी", गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक-४२२००२.
☎ ०२५३-२५७७८७२ / ७३
Email : info@janalaxmibank.in Website : www. janalaxmibank.in

जा.क्र. : एचओ/वार्षिक सभा/ /२०२४-२०२५ दिनांक : २०/०८/२०२४

# ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त भागधारक सभासदांसाठीच)**

**मान्यवर सन्माननीय सभासद बंधू व भगिनींना,** कळविण्यात येते की, **बँकेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०८/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता परशुराम सायखेडकर नाटयगृह, नाशिक** या ठिकाणी बँकेचे **अध्यक्ष, मा.श्री भालचंद्र माधवराव पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणेसाठी सभा बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**-:- सभेपुढील विषय -:-**

१) दिनांक १०/०९/२०२३ रोजी झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि.३१/०३/२०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल,ताळेबंद,नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल वाचून त्याची नोंद घेणे.
४) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने वैधानिक लेखा परिक्षकाच्या नेमणुकीसंदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेणे.
५) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी समावर्ती लेखापरिक्षकाची नियुक्ती करुन मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.
६) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार करुन मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मंजूरी देणे.
७) मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली थकीत कर्जे बँकेचे वसुलीचे अधिकार अबाधीत ठेऊन निर्लिखीत करणे.
८) बँकेने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात प्राईम लेडींग रेटप्रमाणे बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेऊन मान्यता देणे.
९) महाराष्ट्र शासनाने प्रस्तुत केलेल्या एकरकमी कर्ज परत फेड योजनेअंतर्गत वसुलीपात्र रक्कम भरुन घेऊन बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे व त्यास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना दिलेल्या कर्जाचे विवरण वाचून नोंद घेणे.
११) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे (मसुदा अहवालात जोडलेला आहे)
१२) ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या मा.सभासदांना रजा मंजूर करणे.
१३) ९७ व्या घटना दुरुस्ती उपविधीप्रमाणे ज्या सभासदांचे शेअर्स रक्कम रुपये १०००/- च्या आंत आहेत अशा सभासदांना पूर्तता करणेबाबत कळविण्यात आलेले असून त्याबाबत निर्णय घेणे.
१४) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयाचा विचार करणे.

स्थळ: नाशिक
दिनांक : २०/०८/२०२४

संचालक मंडळाचे आदेशावरुन
**अजित गोपाळराव मांडवगणे**
**मुख्य अधिकारी**

---

**विशेष सुचना :-**

१. कोरमअभावी सभा अर्धा तास तहकुब ठेवून त्यानंतर सभेचे कामकाज त्याच ठिकाणी सुरु होईल व पूर्ण केले जाईल.
२. ज्या सभासदांना सभेत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते दि. ०४/०९/२०२४ पर्यंत बँकेत लेखी कळवावे.
३. सन २०२३-२०२४ चे आर्थिक पत्रके व लेखापरिक्षण अहवाल अवलोकनासाठी सर्व सभासदांना बँकेच्या मुख्य कार्यालयात बघावयास मिळतील.
४. ज्या सभासदांनी केवायसी निकषाची पूर्तता केली नसेल त्यांनी त्वरीत बँकेशी संपर्क करुन पूर्तता करावी
५. बँकेचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल कार्यालयीन वेळेत बँकेच्या केंद्र कार्यालय व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.